
# महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक बांधकाम विभाग,

## मुख्य अभियंता,
## सा.बां.प्रादेशिक विभाग,पुणे

# नागरिकांची सनद


उ
२००१-२०२१
रस्ते विकास योजना
सा बां प्रादेशिक विभाग,
पुणे
पुणे
सातारा
सांगली
कोल्हापूर
सोलापूर
रा.म.मा.४
रा.म.मा.९
रा.म.मा.५०
रा.म.मा.२२२
रा.म.मा.२०४
रा.म.मा.१३
प्र.रा.मा.५
प्र.रा.मा.१५
प्र.रा.मा.६
प्र.रा.मा.८
अहमदनगर जिल्हा
उस्मानाबाद जिल्हा
विजापूर जिल्हा
बेळगांव जिल्हा
सिंधुदुर्ग जिल्हा
रत्नागिरी जिल्हा
रायगड जिल्हा
ठाणे जिल्हा
गोवा राज्य
सुची
अ.क्र. | रस्त्याचा प्रकार | याप्रमाणे
१ | द्रुतगती महामार्ग
२ | राष्ट्रीय महामार्ग
३ | प्रमुख राज्य मार्ग
४ | रेल्वे मार्ग
५ | जिल्हा मुख्यालय
Prepared by : UNIVERSAL ENTERPRISES, Kolhapur

## सुची


| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | ४-५ |
| २ | सा.बां.प्रादेशिक विभाग, पुणे कार्यालयाची बांधिलकी व नागरिकांची जबाबदारी | ५ |
| ३ | सा.बां.प्रादेशिक विभागाची रचना | ५ |
| ४ | विभागांतर्गत कार्यपूर्तीचे वेळापत्रक, माहितीची सुलभता व खाजगीकरण | ६ |
| ५ | विभागाच्या कार्यक्षेत्रातील रस्ते सुरक्षितता | ६ |
| ६ | गाऱ्हाण्यांचे निराकरण, सनदेचा आढावा व जनसामान्यांच्या सूचना. | ६-७ |
| ७ | सनदेची अंमलबजावणी व प्रतिसाद | ७ |
| ८ | परिशिष्टे | ८-१० |

## १. प्रस्तावना

सार्वजनिक बांधकाम विभागाला १५० वर्षाहून अधिक वर्षाची गौरवशाली परंपरा आहे. या सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत मुख्य अभियंता, सा.बां.प्रादेशिक विभाग पुणे , हा गेल्या ३३ वर्षापासुन यशस्वीपणे कार्यरत आहे. भारत देशाच्या इतिहासामध्ये महत्त्वपूर्ण स्थान असलेल्या पुणे परिसरामध्ये भारतरत्न सर विश्वेश्वरैय्या यांनी सहाय्यक अभियंता पदावर काम केले आहे. पुणे या महाराष्ट्राची सांस्कृतिक व शैक्षणिक राजधानी असलेल्या ठिकाणी सा.बां.प्रादेशिक विभाग, पुणे चे मुख्यालय नवीन मध्यवर्ती इमारत, तळमजला, पुणे १ येथे आहे. पुणे प्रादेशिक विभागाच्या अखत्यारीतील पुणे, सातारा, सोलापूर, कोल्हापूर , सांगली या जिल्हयामधील सार्वजनिक रस्ते, पूल, इमारतीची मूळ बांधकामे व देखभाल दुरुस्तीची कामे या प्रादेशिक विभागामार्फत केली जातात. या प्रादेशिक विभागात मुख्यत्वे करुन ५२७ कि.मी. राष्ट्रीय महामार्ग, ५,६०० कि.मी.राज्य मार्ग, २३,३६१ कि.मी. जिल्हा रस्ते व २३,९२६ कि.मी. ग्रामीण मार्ग असे एकूण ५३,४८१ कि.मी. लांबीचे रस्ते आहेत. तसेच २२,९८,५८० चौ.मी. क्षेत्रफळाच्या कार्यालयीन इमारती, १६,६८,७१७ चौ.मी. क्षेत्रफळाच्या निवासी इमारती अशा एकूण ३९,६७,२९७ चौ.मी.क्षेत्रफळाच्या इमारती आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागातील पुणे प्रादेशिक विभाग हा पुणे, सातारा, सोलापूर, सांगली, कोल्हापूर या जिल्हयातील सार्वजनिक बांधकामांच्या अनुषंगाने नागरिकांशी बांधिलकी जपण्यास कटीबध्द आहे. ही बांधिलकी सा.बां विभाग, पुणे या सनदे द्वारे जाहीर करत असुन ती स्विकारीत आहे. हा विभाग नागरिकांना खालील सुविधा पुरविण्यास बांधील आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने निर्धारित केलेल्या व पथदर्शीत केलेल्या सार्वजनिक सेवा तत्परतेने सौजन्यपूर्वक व सन्मानपूर्वक वागणूकीने उपलब्ध व्हाव्यात व नागरिकांचे सामाजिक प्रश्न सहानुभूतीपूर्वक सोडवावेत हा दृष्टीकोन विचारात घेऊन तसेच सर्वसामान्य नागरिकांसाठी ही सनद तयार करण्यात आली आहे.

१. पुणे प्रादेशिक विभागाच्या अखत्यारितील मार्गाची देखभाल दुरूस्ती, मानकाप्रमाणे करुन रस्त्याचा दर्जा उत्तम राखणे.
२. पुणे प्रादेशिक विभागातील शासकीय इमारतींची (कार्यालयीन व निवासी इमारती) बांधकामे खात्याने ठरवलेल्या मानकानुसार उत्तम दर्जाची व सुरक्षीत अशी करणे.
३. या विभागाच्या कार्यालयाशी संलग्न असलेल्या इतर सर्व शासकीय विभागांना तांत्रिक सल्ला देंणे व शासकीय कामकाजात सुसुत्रता ठेवणे.
४. या प्रादेशिक विभागाच्या कार्यालयात प्रतिसाद वेळापत्रक प्रदर्शित करणे.
५. आपत्कालीन व्यवस्थेसाठी (जसे महापुरामुळे वाहतूक बंद पडलेल्या रस्त्याची दुरुस्ती करुन वाहतूक चालू करणे ) तात्परतेने अभियांत्रिकीशी संबधीत आवश्यक ती कामे करणे व मदत करणे.
६. प्रादेशिक कार्यालयातील सर्व कर्मचारी वर्गाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या फलकावर जाहिररित्या प्रदर्शित करणे
७. या विभागाच्या कार्यालयात ठरवून दिलेल्या दिवशी व वेळी सर्वसामान्य जनतेची गाऱ्हाणी /तक्रारी ऐकणे व त्यांचे प्रभावीपणे निराकरण करणे.
८. माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत या विभागाच्या अखत्यारीतील मागितलेली माहिती संबंधीतांना विहीत मुदतीत उपलब्ध करुन देणे.
९. कार्यालयांच्या कामकाजात सातत्य ठेवून व आधुनिकता आणून या विभागाच्या कार्यालयांची व सार्वजनिक बांधकाम विभागाची लोकाभिमुखता वाढविणे.
१०. संगणकीकरणाबाबत या विभागाच्या सर्व मंडळा अंतर्गत विभागीय कार्यालये यांना अवगत करणे व नेटवर्कने जोडणे. प्रादेशिक कार्यालय व मंत्रालय यांना नेटवर्कद्वारे आवश्यक व तातडीची माहिती त्वरीत उपलब्ध होण्यासाठी प्रयत्नशिल राहणे.

११. या विभागांतर्गत आवश्यक व अद्यावत विविध माहिती त्वरीत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.com या संकेत स्थळावर (वेबसाईटवर) उपलब्ध करणे व अद्यावत करणे.

१२. कार्यालयांमध्ये सर्व अभिलेखे अद्ययावत करणे व त्याची वर्गवारी करुन अभिलेख कक्ष नोंदवहीसह अद्यावत करणे.

१३. नागरिकांच्या सनदेस व्यापक प्रसिध्दी देणे.

**२. सा. बां. प्रादेशिक विभाग, पुणे कार्यालयाची बांधिलकी व नागरिकांची जबाबदारी**

**♦ सा.बां. प्रादेशिक विभाग पुणे कार्यालयाची बांधिलकी -**

वरील सर्व कर्तव्ये पार पाडतांना सा.बां.प्रादेशिक विभाग, पुणे

अ) सेवेच्या गुणवत्तेची बांधिलकी ठेवील.

ब) सौजन्यपूर्ण व मदतीची भावना ठेवून कामाचा वेळेत निपटारा करेल.

क) पारदर्शकता व निष्ठा ठेवील. यासाठी वेळोवेळी विविध परवानापत्रे / प्रमाणपत्रे / ना-हरकत प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी कार्यपध्दती, पत्रके नागरिकांच्या माहितीसाठी उपलब्ध करण्यात येतील.

**♦ नागरिकांची जबाबदारी -**

- शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचेशी नागरिकांची वर्तणूक सौजन्यपूर्वक असावी.
- नागरिकांकडून आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे परिपूर्णरित्या मिळावी.
- नागरिकांचा प्रतिसाद विकासाला मदत करणारा असावा.
- विहीत केलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीत सेवा पूरविण्याचा आग्रह धरु नये.
- सार्वजनिक मालमत्तेची व्यवस्था पाहण्यास सहकार्य करावे.
- नागरिकांनी स्वेच्छेने अतिक्रमणे दूर करावीत व पुन्हा सरकारी जागांवर अतिक्रमणे करु नयेत.
- रस्त्याच्या दोन्ही बाजूंना असणाऱ्या वृक्षराजींचे जतन ही नागरिकांची सुध्दा जबाबदारी राहील.
- नागरिकांनी कायदेशीर तरतूदी, नियम, अलिखीत संकेत यांचे पालन करावे.
- नागरिकांनी सार्वजनिक हित, एकात्मता व अखंडता जोपासण्यासाठी सहकार्याची भावना ठेवावी.

**३. सा. बां प्रादेशिक विभाग पुणे कार्यालयाची रचना.**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रादेशिक स्तरावरील मुख्य अभियंता सा.बां.प्रादेशिक विभाग पुणे कार्यालय शासनाने दि.०१/०६/१९७६ रोजी स्थापन केले आहे. सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग पुणे अंतर्गत अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, पुणे, अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, सातारा, अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, सोलापूर, अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, कोल्हापूर व अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, पुणे ही मंडळ कार्यालये असून त्यांचेकडे त्या त्या जिल्हयाचे व कोल्हापूर मंडळाकडे सांगली व कोल्हापूर जिल्हयाचे कार्यक्षेत्र येते. दक्षता व गुणनियंत्रण विभागाकडे पाचही जिल्हयामधील दक्षता व गुणनियंत्रणाची कामे केली जातात. हया विभागाचे क्षेत्रिय अधीक्षक अभियंता यांचे अधिपत्याखाली एकूण ३३ कार्यकारी अभियंता व १९५ उप अभियंता कार्यरत आहेत. अधीक्षक अभियंता यांचे कार्यक्षेत्राचा नकाशा नागरिकांचे सनदेचे सुरुवातीला दर्शविण्यात आलेला आहे. कार्यकारी अभियंता यांची मुख्यालये दर्शविणारा वृक्ष - तक्ता (Tree- Chart ) परिशिष्ट अ म्हणून सोबत जोडला आहे.

कार्यकारी अभियंता यांचे अधिकार क्षेत्रातील सार्वजनिक बांधकाम विभाग हा खऱ्या अर्थाने माहितीचा स्त्रोत असतो. कुठल्याही बांधकामाची सविस्तर माहिती अगदी सुरवातीपासून अशी संबधीत कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयात मिळू शकते. प्रस्तावनेत नमूद केलेल्या सार्वजनिक सेवा सार्वजनिक बांधकाम विभाग पुरवित असतो. हया विभागांतर्गत कामांच्या अंमलबजावणीसाठी सा.बां.नियमावली, लेखा संहिता, विनिर्देश, वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रके इत्यादीचे काटेकोरपणे पालन क्षेत्रिय अधिकाऱ्याकडून केले जाते.

**४. विभागांतर्गत कार्यपुर्तीचे वेळापत्रक, माहितीची सुलभता व खाजगीकरण करणे.**

**अ) कार्यपुर्तीचे वेळापत्रक**

सा.बां.प्रादेशिक विभाग, पुणे कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील, विविध ना हरकत प्रमाणपत्रे मिळण्यासाठी लागणारा कालावधी, त्यास सक्षम अधिकारी इत्यादीची माहिती, तसेच रस्ते, पुल व इमारती आणि इतर कामांविषयीची माहिती कार्यपुर्तीचे वेळापत्रकात (परिशिष्ट ब ) नमुद केली आहे. अर्जाचा विहित नमुना व जोडावयाची आवश्यक कागदपत्रे याची माहिती विहित फी भरुन संबंधित विभागीय कार्यालयात मिळू शकेल.
नैसर्गिक आपत्ती, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न इ. उद्‌भल्यास या वेळापत्रकातील कार्यपुर्तीच्या कालावधीत वाढ होऊ शकेल.

**ब) माहितीची सुलभता**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd. com या वेबसाईटवरुन (संकेत स्थळावरुन) वेळोवेळी सादर केल्या जाणाऱ्या विभागांतर्गत माहितीचा तपशील व आकडेवारीचा तपशील जनतेला सुलभतेने उपलब्ध होईल.

**क) खाजगीकरण**

विशेषतः शहरी भागाच्या विकास कामांसाठी व मोठ्या प्रकल्पांसाठी अर्थसंकल्पातुन उपलब्ध होणारा अल्प निधी व काळाची गरज, या कारणांमुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने विकास कामांमध्ये खाजगी क्षेत्राचा सहभाग 'बांधा, वापरा व हस्तांतरीत करा' या तत्वावर सुरु केला आहे. यामुळे ग्रामीण भागाकडे अधिक विकास निधी उपलब्ध करणे शक्य होणार आहे. कार्यक्रमाची परिणामकारकता, जनतेचे अभिप्राय इत्यादीचा अभ्यास करुन पुढील दिशा व धोरण शासनस्तरावर ठरविले जाते.

**५. सा. बां. प्रादेशिक विभाग, पुणे कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रस्ते सुरक्षितता.**

सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्यांची सुरक्षितता वाढविण्यासाठी "अपघात निवारण समिती" स्थापन केली आहे. ही समिती प्रत्यक्ष पाहणी करुन रस्त्यांवरील अपघात प्रवण स्थळे शोधते व अशा स्थळांची सुधारणा करण्यासाठी उपाययोजना सुचविते.

समितीने सुचविलेल्या स्थळांची सुधारणा टप्प्या टप्प्याने हाती घेण्यात येते. तपशीलवार व आवश्यक असे माहिती फलक रस्त्यांवर लावले जातील, जेणेकरुन रस्ते वाहतुकीस पादचाऱ्यांसह सर्वांना सर्वकाळ सुरक्षित राहतील.

**६ . गाऱ्हाण्यांचे निराकरण सनदेचा आढावा, व जनसामान्यांच्या सूचना.**

**अ) गाऱ्हाणी/तक्रारी यांचे निराकरण**

कार्यपूर्तीस होणारा विलंब वा अन्य काही गाऱ्हाणी विभागाबाबत अथवा काही कामाबाबत तक्रारी असतील तर, त्यासाठी नागरिकांनी ज्या विशिष्ट कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणे / तक्रार असेल तर त्या कार्यालयाच्या वरिष्ठ कार्यालय प्रमुखांकडे तक्रार नोंदवावी म्हणजे उदाहरणार्थ - उपविभागीय कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणे / तक्रारी असल्यास विभाग कार्यालय प्रमुखांकडे म्हणजे कार्यकारी अभियंता यांचेकडे गाऱ्हाणे मांडावे, तक्रार नोंदवावी व विभाग कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणे/ तक्रार असल्यास मंडळ कार्यालयाच्या अधीक्षक अभियंत्यांकडे गाऱ्हाणे मांडावे, तक्रार नोंदवावी. व मंडळ कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणे/तक्रार असल्यास मुख्य अभियंता यांचेकडे गाऱ्हाणे मांडावी, तक्रार नोंदवावी. अशा गाऱ्हाणी/तक्रारींचे निराकरण वरिष्ठ कार्यालयाकडून ७ दिवसात करण्यात येईल. गाऱ्हाणी / तक्रारी नोंदविण्यासाठी प्रत्येक कार्यालयात स्वतंत्र तक्रार पेटी ठेवण्यात येत आहे. गाऱ्हाणी समक्ष भेटीत /पत्राने वा "ई" मेलद्वारेही नागरिक मांडू शकतात.

**ब) नागरिकांच्या सनदेचा आढावा / सिंहावलोकन**

या विभागाच्या नागरिकांच्या सनदेच्या उपयुक्ततेबाबतचा तथा परिणामकारकतेचा आढावा सा.बां. प्रादेशिक विभाग, पुणे अंतर्गत घेण्यात येईल व त्याचा अहवाल प्रसिध्द करण्यात येईल.

**क) जनसामान्यांकडून सुचना**

या विभागाची ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरिकांच्या बहुमुल्य सुचनांचा गांभिर्यपुर्वक विचार करुन त्यात वेळोवेळी सुधारणा घडवुन आणता येईल. ही नागरिकांची सनद स्वतःहुन काही नवीन कायदेशीर हक्क निर्माण करीत नाही. ती ग्राहकांना म्हणजेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सेवा उपभोगणाऱ्या नागरिकांना जादा हक्क मांडण्यासाठी मदत करते.

**७. नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी**

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत या प्रादेशिक विभागाच्या नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी करण्यास प्रादेशिक विभाग कटिबध्द आहे. सनदेस व्यापक प्रसिध्दी देऊन नागरिकांच्या प्रतिक्रिया /अभिप्राय मागविण्यात येतील व त्यांच्या सुचनांचा यथोचीत आदर करुन आवश्यक बदल करण्यात येतील. सा.बां. प्रादेशिक विभाग,पुणे खात्रीपुर्वक गुणवतेची सेवा पुरविण्याची हमी देत आहे. हया प्रादेशिक विभागाच्या अखत्यारीतील कुठल्याही माहितीसाठी नागरिकांना संवेदनशील सौजन्यपुर्ण व मदत करण्याच्या भावनेने वर्तणूक मिळेल. कार्यपध्दती अधिक लोकाभिमुख, सुलभ व आटोपशिर करण्यासाठी नागरिकांचा सल्ला घेतला जाईल. भ्रष्टाचारास आळा घालण्यात येईल. तसेच नागरिकांच्या गाऱ्हाण्यांचे कालबध्द निराकरण करण्यात येईल.

**८. परिशिष्टे**

अ) मुख्यालय दर्शविणारा वृक्षतक्ता (Tree Chart )

ब) कार्यपूर्तीचे वेळापत्रक

## परिशिष्ट (अ) मुख्यालय दर्शविणारा वृक्षतक्ता (Tree Chart )

**मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे.**

| अधीक्षक अभियंता सा.बां.मंडळ,पुणे | अधीक्षक अभियंता सा.बां.मंडळ,सातारा | अधीक्षक अभियंता सा.बां.मंडळ,सोलापूर | अधीक्षक अभियंता सा.बां.मंडळ,कोल्हापूर | अधीक्षक अभियंता दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, पुणे |
|---|---|---|---|---|
| कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग,पुणे (७ उपविभाग) | कार्यकारी अभियंता सा.बां.(प.)विभाग,सातारा (७ उपविभाग) | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग,सोलापूर (४ उपविभाग) | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग,कोल्हापूर (४ उपविभाग) | कार्यकारी अभियंता दक्षता (३ उप अभियंते) |
| कार्यकारी अभियंता सा.बां.(उत्तर)विभाग,पुणे (७ उपविभाग) | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग,सातारा (७ उपविभाग) | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग,सोलापूर (४ उपविभाग) | कार्यकारी अभियंता सा.बां.(दक्षिण)विभाग,कोल्हापूर (५ उपविभाग) | कार्यकारी अभियंता (२ उप अभियंते) |
| कार्यकारी अभियंता सा.बां.(पूर्व)विभाग,पुणे (७ उपविभाग) | कार्यकारी अभियंता मार्ग प्रकल्प विभाग,सातारा (४ उपविभाग) | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग,पंढरपूर (४ उपविभाग) | कार्यकारी अभियंता रा.म. वि.क्र.७ कोल्हापूर (३ उपविभाग) | उप अभियंता प्रयोगशाळा, पुणे |
| कार्यकारी अभियंता सा.बां.(दक्षिण)विभाग,पुणे (७ उपविभाग) | कार्यकारी अभियंता रा.म. वि.क्र..६, सातारा (२ उपविभाग) | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग,अकलूज (४ उपविभाग) | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग,मिरज (७ उपविभाग) | उप अभियंता प्रयोगशाळा, सोलापूर |
| कार्यकारी अभियंता मार्ग प्रकल्प विभाग,पुणे (४ उपविभाग) | कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद (उत्तर), पुणे (६ उपविभाग) | कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग वि.सोलापूर (३ उपविभाग) | कार्यकारी अभियंता सा.बां.(पश्चिम) विभाग,सांगली (६ उपविभाग) | उप अभियंता प्रयोगशाळा, कोल्हापूर |
| कार्यकारी अभियंता सा.बां.(इमारती)विभाग, पुणे (५ उपविभाग) | कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद (दक्षिण), पुणे (५ उपविभाग) | कार्यकारी अभियंता जि.प.क्र.१,सोलापूर (३ उपविभाग) | कार्यकारी अभियंता मार्ग प्रकल्प विभाग,सांगली (३ उपविभाग) | |
| कार्यकारी अभियंता सा.बां.प्रकल्प विभाग, पुणे (४ उपविभाग) | | कार्यकारी अभियंता जि.प.क्र..२,सोलापूर (५ उपविभाग) | कार्यकारी अभियंता वि.प्र.(सा.बां.)वि. कोल्हापूर (३ उपविभाग) | |
| कार्यकारी अभियंता जि.परिषद (दक्षिण),पुणे (३ उपविभाग) | | | कार्यकारी अभियंता जि.प.विभाग,कोल्हापूर (५ उपविभाग) | |
| कार्यकारी अभियंता जि.परिषद (उत्तर),पुणे (५ उपविभाग) | | | कार्यकारी अभियंता जि.प.विभाग,सांगली (८ उपविभाग) | |

**सूची**

**अ.अ..** **अधीक्षक अभियंता**
**का.अ...** **कार्यकारी अभियंता**
**सा.बां...** **सार्वजनिक बांधकाम**
**वि. ....** **विभाग**
**वि.प्र...** **विशेष प्रकल्प**
**जि.प. ..** **जिल्हा परिषद**
**रा.म. ..** **राष्ट्रीय महामार्ग**

**परिशिष्ट - ब**

| .अ .क्र. | सेवांचा तपशील | सेवा पुरविणारे अधिकारी/कर्मचायांचे नाव व हुद्दा | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिकायांचे नाव व हुद्दा |
|---|---|---|---|---|
| १ | कंत्राटदार वर्ग ४ व ४ (अ ) नोंदणी व नुतनीकरण | मुख्य अभियंता, क्षेत्रिय कार्यालय | ६० दिवस | सचिव, सा.बां.वि. मंत्रालय, मुंबई |
| २ | कंत्राटदार वर्ग ५,६ आणि बेरोजगार अभियंतांचे नोंदणीकरण व मजूर सहकारी संस्था वर्ग अ यांचे वर्गीकरण व नुतनीकरण | .अधीक्षक अभियंता | ३० दिवस | मुख्य अभियंता सा.बां.प्रा.वि.पुणे |
| ३ | कंत्राटदार वर्ग ७,८,९ आणि मजूर कामगार सहकारी संस्था वर्ग ब यांचे वर्गीकरण, इमारत देखभाल व स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचे वर्ग ७ मध्ये नोंदणीकरण व नुतनीकरण | कार्यकारी अभियंता | ३० दिवस | .अधीक्षक अभियंता संबंधित मंडळ |
| ४ | विश्रामगृहांचे आरक्षणपत्र | कार्यकारी अभियंता | ७ दिवस. शिवाय .ऑनलाइन .आरक्षणही .उपलब्ध | .अधीक्षक अभियंता संबंधित मंडळ |
| ५ | रस्त्याच्या कडेला असलेल्या इमारतीचा ना हरकत परवाना | कार्यकारी अभियंता | ३० दिवस | .अधीक्षक अभियंता संबंधित मंडळ |

| .अ .क्र. | कार्यसूची | कार्यवाही करणारा सक्षम अधिकारी | कार्यपूर्तीचा कालावधी मर्यादा | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिकायांचे नाव व हुद्दा |
|---|---|---|---|---|
| ६ | रस्ता ओलांडून जाणा-या वाहिन्यांसाठी ना-हरकत प्रमाणपत्र | मुख्य अभियंता- राष्ट्रीय महामार्गासाठी व अधीक्षक अभियंता- इतर मार्गासाठी | ३० दिवस | सचिव, सा.बां.वि. मंत्रालय, मुंबई<br>मुख्य अभियंता सा.बां.प्रा.वि.पुणे |
| ७ | चलतचित्रपट गृहांचे योग्यता प्रमाणपत्र | कार्यकारी अभियंता | १५ दिवस | .अधीक्षक अभियंता संबंधित मंडळ |
| ८ | सरकारी इमारतींचे ''ना .उपलब्धता'' प्रमाणपत्र. | कार्यकारी अभियंता | १५ दिवस | .अधीक्षक अभियंता संबंधित मंडळ |
| ९ | सरकारी निवासस्थान न मिळण्याचे प्रमाणपत्र (अनुपलब्धता) | कार्यकारी अभियंता | ७ दिवस | .अधीक्षक अभियंता संबंधित मंडळ |
| १० | सरकारी निवासस्थान मिळण्याबाबतचे प्रतिक्षा यादी क्रमांक | कार्यकारी अभियंता | ७ दिवस | .अधीक्षक अभियंता संबंधित मंडळ |
| ११ | सरकारी निवासस्थानी राहणा-या निवृत्त कर्मचा-यांच्या बाबतचे ना हरकत दाखले | कार्यकारी अभियंता | ३० दिवस | .अधीक्षक अभियंता संबंधित मंडळ |
| १२ | रास्त भाडे/ प्रमाणभाडे प्रमाणपत्र | कार्यकारी अभियंता | १५ दिवस | .अधीक्षक अभियंता संबंधित मंडळ |
| १३ | इमारतींच्या भाडयांचे निश्चितीकरण | कार्यकारी अभियंता | १५ दिवस | .अधीक्षक अभियंता संबंधित मंडळ |
| १४ | इमारतीचे मूल्यनिश्चितीकरण | कार्यकारी अभियंता | ३० दिवस | .अधीक्षक अभियंता संबंधित मंडळ |
| | | | | |
| टिप - सर्व वर्गाच्या नोंदणी व नुतनीकरण करणेसाठी अर्ज कार्यकारी अभियंता यांचेकडे स्विकारण्यात येतात. | | | | |